ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख १ एप्रिल, १९५३ | अंक ११

## विविध माहिती

**बिनतारीनें दिवे लावणार**—न्यूयॉर्क नगरपालिकेनें बिनतारीच्या साह्यानें रस्त्यावरील दिवे लावण्यासाठी व मालविण्यासाठी एक केंद्र उघडण्याची परवानगी मागितली आहे. शहरांत १,८०,००० दिवे आहेत. त्यांना एक रिसीव्हर व एरिअल लावून ही व्यवस्था करण्यांत येणार आहे. ह्या पद्धतीनें दरसाल ५,००,००० डॉलर्स खर्च वाचेल, असें म्यु. पल अधिकाऱ्यांचें म्हणणें आहे.

**टेलिव्हिजनच्या सेट्सची निर्यात**—ब्रिटनमधील रेडिओचे कारखानदार आतां टेलिव्हिजनचे सेट्स मोठ्या प्रमाणावर तयार करूं लागले आहेत. १९५१ सालीं ब्रिटनमध्यें ८,१०,००० सेट्स तयार करण्यांत आले. १९५२ सालीं ७,८२,००० सेट्स ब्रिटनमध्यें विकण्यांत आले आणि ६,००० परदेशीं निर्यात करण्यांत आले. त्यांतील बहुतेक टेलिव्हिजन सेट्स कॅनडा व ब्राझिल ह्या देशांना पाठविण्यांत आले.

**ब्रिटनमधील पुस्तकांचें प्रकाशन**—१९५२ सालीं ब्रिटनमध्यें पुस्तकांच्या प्रकाशनाचा उच्चांक गाठण्यांत आला. १९५१ सालीं १८,०६६ पुस्तकें प्रकाशित करण्यांत आलीं होतीं, तर ५२ सालीं १८,७४१ पुस्तकें प्रकाशित झालीं. केवळ मनोरंजनासाठीं असणारीं पुस्तकें आतां कमी प्रसिद्ध होत असून तांत्रिक विषयावरील पुस्तकांची संख्या मात्र वाढत चालली आहे.

**हातमागवाल्यांची युनिअन**—बडोदा येथील हातमागवाल्यांनीं व यंत्रचालित. मागवाल्यांनीं आपली एक संस्था स्थापन केली आहे. संस्थेची घटना बनविण्यासाठी २१ जणांची एक तात्पुरती कमिटी नेमण्यांत आली आहे.

**अमेरिकेंतील नियंत्रणें संपलीं**—अमेरिकन सरकारनें पदार्थांच्या किंमतीवरील उरलींसुरलीं नियंत्रणेंहि रद्द केलीं आहेत. पोलाद, मिश्र-धातू, यांत्रिक हत्यारें व कित्येक रसायनें ह्यांच्यावरील नियंत्रणें नुकतींच रद्द करण्यांत आलीं. येत्या १३ एप्रिल पर्यंत सर्व नियंत्रणें उठविण्यांत येणार आहेत.

**हिंदी किनाऱ्यावरील माल वहातुक**—हिंदी किनाऱ्यावरील माल वहातुकीपैकीं ९६% वहातुक १९५२ मध्यें हिंदी आगबोट कंपन्यांनीं केली. १९५३ मधील आतांपर्यंतचें तत्सम प्रमाण ९९.५% आहे.

**निझामाचा जामदारखाना**—निझामांच्या जामदारखान्यांतील रत्नांचा शेवटचा हप्ता खास विमानानें नुकताच मुंबईला आणण्यांत आला. मुंबईत दाखल झाल्याबरोबर लगेच तो सुरक्षित ठिकाणीं हलविण्यांत आला.

**बिर्लांनीं कारखाने घेतले**— सिरपूर येथील कागदाची गिरणी व सिरसिल्क रेयॉन मिल्स हे दोन कारखाने बिर्ला बंधूंनीं हैद्राबाद सरकारच्या वतीनें चालविण्यास घेतले आहेत. हा करारनामा भागधारकांकडून मंजूर झाल्यावर भारत सरकारचीहि मान्यता त्याला घ्यावी लागणार आहे.

**भारतांत आलेले परदेशी प्रवासी**—१९५२ मध्यें भारतांत २५,४४८ परदेशी प्रवासी आले. त्यांपैकीं ४,९४५ पाकिस्तानी, ६,७६० ब्रिटिश व ४,८८९ अमेरिकन होते. १९५० मध्यें उतारू आकर्षण्याच्या मोहिमेवर १,२०,८८२ रु. खर्च करण्यांत आला; १९५१ मध्यें तो खर्च २,०७,४०९ रु. झाला. परदेशी उतारूंमुळें भारतास २½ कोटि रुपये मिळाले असावेत.

**लंडनमध्यें भारतीय तैलचित्रांचें प्रदर्शन**— लंडनमध्यें ४०० निवडक हिंदी चित्रकारांच्या तैलचित्रांचें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. हीं सर्व चित्रें एका लष्करी अधिकाऱ्यानें जमविलीं आणि व्हिक्टोरिआ व अल्बर्ट म्युझिअमला भेट म्हणून दिलीं. प्रदर्शन ३१ ऑगस्ट पर्यंत खुलें रहाणार आहे.

**हैद्राबाद सरकारला कर्ज**— हैद्राबाद राज्यांत नव्या विहिरी खोदण्यासाठी आणि जुन्यांची दुरुस्ती करण्यासाठी भारत सरकारनें राज्य सरकारला २४ लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. कर्ज १९५४-५५ सालापासून पांच वार्षिक हप्त्यांनीं परत करावयाचें आहे. व्याजाचा दर ३½ टक्के आहे.

**अबू येथील मंदिरांची दुरुस्ती**— राजस्थानमध्यें अबूच्या पहाडावर जैन लोकांचीं कलापूर्ण दिलवारा देवालयें आहेत. ह्या ठिकाणीं प्रवाशांची गर्दी होत असते. देवळांची दुरुस्ती करण्यासाठी १० लाख रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

**मिठासाठी संशोधन केंद्र**—सौराष्ट्रांत भावनगर येथें मिठाबाबत संशोधन करण्यासाठीं एक संशोधन-केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. भारतांत निरनिराळ्या प्रकारांचें संशोधन करण्यासाठी ज्या संस्था काढण्यांत येत आहेत, त्यांपैकीं ही बारावी संस्था आहे. ह्या संस्थेसाठी ५ लाख रुपये खर्च येणार आहे.

**हें खरें असेल काय?**— सुप्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ डॉ. हॅरोल्ड युरे ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं आपल्या सूर्यमालेच्या बाहेर असणाऱ्या हजारों ग्रहावर मानवी जीवन असावें.

**युरोपमध्यें खोट्या चेक्सचा सुळसुळाट**— सध्यां युरोपमध्यें वॉशिंग्टन येथील इंपोर्ट-एक्स्पोर्ट बँकेवर काढलेल्या खोट्या चेक्सचा सुळसुळाट झाला आहे. खोटे चेक्स छापणाऱ्या गुन्हेगारांनीं आतांपर्यंत लोकांना २ लाख डॉलर्सना बुडविलें आहे.

## स्टॅलिनचें वारसा धन : प्रचंड उत्पादनशक्ति

रशिअन क्रांतीचा एक थोर नेता म्हणून स्टॅलिन ह्यांचें नांव जगभर दुमदुमलें होतें. त्यांच्या मरणानंतर रशिआंत राजकीय सत्तेबद्दल स्पर्धा सुरू होईल असा प्रचार अमेरिकेंत मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत होता. स्टॅलिन ह्यांच्या मृत्यूनंतर होणाऱ्या संभाव्य राजकीय घडामोडींवरच एकंदरीनें फार भर देण्यांत आला होता. पण फ्रान्समधील दोन गंभीर प्रकृतीच्या वृत्तपत्रांनीं एका उपेक्षित म्हणजे आर्थिक बाजूचाहि चांगला परामर्ष घेतला आहे.

'ली कॉंबट' हें कम्युनिस्ट विरोधी पत्र म्हणतें कीं रशिआला आपलें आंतरराष्ट्रीय वजन वाढविण्यास आतां कम्युनिस्टांच्या प्रचारात्मक घोषवाक्यांवर अवलंबून रहाण्याचें कारण राहिलेलें नाहीं. अन्न आणि औद्योगिक उत्पादन ह्यांचा रशिआला उपयोग करतां येईल. कम्युनिस्टांच्या सुंदर प्रचारापेक्षा ह्या गोष्टींचा परिणाम अविकसित राष्ट्रांवर अधिक चांगला होतो. स्टॅलिननें आपल्या वारसासाठीं आर्थिक दृष्ट्या अफाट प्रगति केलेला रशिआ ठेवला आहे. ज्या राज्यानें लोकांचें रहाणीचें मान सुधारण्यांत यश मिळविलें आहे, त्या राज्याचे लोक आपल्या सरकारवर कधींच उलटणार नाहींत. सोव्हिएट रशिआच्या आर्थिक शक्तीबद्दल पाश्चात्य राष्ट्रांना फारशी विश्वास ठेवण्यासारखी माहिती असत नाहीं. रशिआच्या आर्थिक बळाची ज्यांना कल्पना आहे त्यांना हें स्पष्ट समजूं शकतें कीं, रशिआपासून असणारें भय लष्करी स्वरूपाचें नसून आर्थिक आणि सामाजिक स्वरूपाचें आहे.

'ली मॉंड' हें दुसरें वजनदार पत्र म्हणतें कीं, रशिआचा युरोपांत झालेला विस्तार अगर त्याच्या तत्त्वज्ञानाचा जगभर झालेला प्रसार ह्या गोष्टी कांहीं स्टॅलिननें मागें ठेवलेल्या वारसाधनाचीं लक्षणें नाहींत; रशिआची प्रचंड औद्योगिक उत्पादनशक्ति हें खरें वारसाधन आहे. ह्या उत्पादनशक्तीमुळें रशिआचें रहाणीचें मान आपल्यापेक्षा सुधारलें तर आपली परिस्थिति काय होईल? ह्या शांततामय स्पर्धेत कोण यशस्वी होईल? सध्यां फ्रान्समधील रहाणीचें मान सुधारणें बंद झालें आहे. ईकॉनॉमिक कमिशन फॉर युरोप ह्या संयुक्त राष्ट्र-संघटनेच्या संस्थेनें जो अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे, त्यावरून असें दिसतें कीं, १९५५ ते १९६० च्या दरम्यान रशिआंतील रहाणीचें मान फ्रान्सपेक्षा अधिक उच्च प्रतीचें होईल. रशिआनें १९२९ सालापासून आजतागायत आर्थिक प्रगतीचा जो वेग ठेवला आहे तो तसाच चालू ठेवला आणि फ्रान्स आपलें भांडवल खाऊनच जर जगूं लागला तर फ्रान्सचा पराभव झाल्यासारखाच आहे. कारण, १९५३ सालचा फ्रान्स १९२९ च्या फ्रान्स इतकाच आर्थिक दृष्ट्या प्रगत झालेला आहे. अर्थात् ह्या भविष्यकथनांत अमेरिकेचा विचार करण्यांत आलेला नाहीं. पण आर्थिक दृष्ट्या युरोप अप्रगत राहिला तर अमेरिका तरी काय करूं शकणार? आज चाललेल्या शीत-युद्धांत अविकसित देश हे त्यादी होऊन राहिलीं आहेत. पण त्यांच्यावरहि अखेर परिणाम आर्थिक प्रगतीचाच होणार. पण दरम्यान रशिआची शांततामय स्पर्धा मात्र अधिकाधिक उग्र स्वरूप धारण करूं लागली आहे. रशिअन सामाजिक रचनेची स्पर्धा सोव्हिएट-शासित देशांच्या बाहेरील देशांना जाणवूं लागली आहे. ह्या स्पर्धेशीं टक्कर देण्यासाठीं अमेरिकेनें अशा देशांशीं योग्य त्या तत्त्वावर व्यापार केला पाहिजे. म्हणूनच ब्रिटनसारखे देशहि आतां असें म्हणूं लागले आहेत कीं, आम्हांला अमेरिकेची मदत नको आहे; अमेरिकेशीं व्यापार पाहिजे आहे. असा व्यापार झाला तरच रशिअन स्पर्धेला तोंड देतां येणें शक्य होईल.

### हिंदी रेल्वेजची वाढ

| वर्ष | रस्त्यांची लांबी (मैल) | गुंतलेलें भांडवल (कोटी रु.) | निव्वळ उत्पन्न (लक्ष रु.) |
|---|---|---|---|
| १८५३ | २० | ०.४ | ०.५ |
| १८६० | ८३८ | २६ | २९ |
| १८७० | ४,७७१ | ९० | ३,०३ |
| १८८० | ८,९९६ | १२८ | ६,३८ |
| १८९० | १६,४०४ | २१३ | १०,३६ |
| १९०० | २४,७५२ | ३२९ | १६,४५ |
| १९१० | ३२,०९९ | ४३९ | २३,९८ |
| १९१९–२० | ३६,३७५ | ५६६ | ३८,४९ |
| १९२३–२४ | ३८,०३९ | ७१७ | ३९,३४ |
| १९५३–५४ | ३४,१२० | ८८३ | ५१,०८ |

[ ह्या आकड्यांत हिंदी संघराज्यांतील रेल्वेजचाच विचार केलेला आहे. १९३७ मध्यें वेगळी झालेली बर्मा रेल्वे (२०५७ मैल व १९४७ मध्ये वेगळ्या झालेल्या पाकिस्तानी रेल्वेज (६,७४८ मैल) ह्यांचे आंकडे समाविष्ट नाहींत.]

### सेक्रेटरी ट्रेनिंग क्लास

नाशिक जिल्ह्यासाठीं खास सहकारी सोसायट्यांचे सेक्रेटरीज आणि विद्यमान नोकरांसाठीं तसेंच इतर उमेदवारांसाठीं ट्रेनिंग क्लास मालेगांव येथें तारीख २–४–१९५३ ते १६–५–१९५३ अखेर मुदतीचा भरवावयाचा आहे. ज्या संस्थांचे नोकरांना शिक्षण द्यावयाचें असेल त्यांनीं आपल्या संस्थांमार्फत अर्ज करावेत. ज्या उमेदवारांना सहकारी शिक्षण घ्यावयाचें असेल त्यांनीं अगर सोसायट्यांच्या सेक्रेटरींनीं को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग इन्स्पेक्टर, २१७८ मधली हाळी, नाशिक, यांचेकडे १–४–१९५३ चे आंत अर्ज करावेत. अर्जासोबत क्लास फी रु. २ लगत पाठवावी. क्लास–फीशिवाय अर्ज स्वीकारले जाणार नाहींत. उमेदवार व नोकरांना सदर शिक्षण स्वखर्चानें घ्यावें लागेल. क्लास फी भरल्यानंतर कोणत्याहि सबबीवर परत केली जाणार नाहीं. उमेदवाराचें शिक्षण निदान व्ह. फा. पास व इंग्रजी पांचवी इयत्तेपर्यंत घेतलेलें पाहिजे अगर सहकारी संस्थेंत काम करीत असला पाहिजे. उमेदवारांनीं अर्जांत नांव, शिक्षण, वय, पूर्ण पत्ता आणि सहकारी संस्थेंत काम करीत असलेबद्दल दाखला, जोडून नमूद करून पाठवावे. क्लासचे मुदतींत परिक्षा फी रु. २ भरावी लागेल. त्याशिवाय परीक्षेस बसविले जाणार नाहीं. क्लासानंतर परिक्षेंत यशस्वी उमेदवारांना सहकारी संस्थेंत नेमतांना सदर शिक्षणास प्राधान्य यापुढें दिलें जाईल. विद्यमान नोकरांनीं सदर शिक्षण घेऊन उत्तीर्ण झाल्याशिवाय त्यांना यापुढें कामावर ठेवले जाणार नाहीं अशी खात्याची दृष्टि आहे. तरी याकडे नोकरांनीं विशेष लक्ष देवून सदर क्लासांत शिक्षण घेण्याची दक्षता घ्यावी. उमेदवारांनीं मालेगांव तालुका को–ऑपरेटिव्ह सुपरवायझिंग युनियनचे ऑफिसांत समक्ष जातीनें तारीख २–४–१९५३ रोजीं दुपारीं २ वाजतां बिनचूक हजर व्हावें.

| | |
|---|---|
| एन. वाय. कुलकर्णी | वामनराव गोविंदराव पाटील |
| को–ऑपरेटिव्ह ट्रेनिंग | चेअरमन, |
| इन्स्पेक्टर, नाशिक. | नाशिक डिस्ट्रिक्ट को. बोर्ड लि. |

# अर्थ

बुधवार, ता. १ एप्रिल, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आर्थिक नियोजन आणि खानेसुमारी

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आर्थिक व सामाजिक समितीची पॉप्युलेशन कमिशन ह्या नांवाची एक उपसंघटना आहे. ह्या उपसंघटनेकडे राष्ट्रसंघटनेच्या आंकडेशास्त्रज्ञांनीं जगाच्या लोकसंख्येसंबंधीं एक अहवाल पाठविला आहे. त्यांच्या मताप्रमाणें जगाची लोकसंख्या येत्या ७० वर्षांत दुप्पट होईल. ह्या वाढत्या लोकसंख्येचा योगक्षेम चालेल इतकें उत्पादन व इतकी साधनसामुग्री वाढवितां येईल काय, असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. गेल्या दहा वर्षांत जगांत ज्या खानेसुमाऱ्या झाल्या त्यांचा आणि सामाजिक–आर्थिक प्रश्नांचा अभ्यास शास्त्रीय रीतीनें करण्याचें काम संयुक्त-राष्ट्रसंघटनेनें आपल्या अंगावर घेतलें आहे. असा संशोधनात्मक अभ्यास झाला तर किती लोकसंख्येसंबंधीं नियोजन करावें लागेल आणि तें अंमलांत आणण्यासाठी आवश्यक काम करूं शकणारे किती लोक असतील ह्यावर बराच प्रकाश पडूं शकेल, असा आंकडेशास्त्रज्ञांचा अंदाज आहे. खानेसुमारी घेण्याच्या कामास १८ व्या शतकांत प्रथम प्रारंभ झाला. परंतु १८५० मध्यें अवघ्या २० कोटी लोकांचीच खानेसुमारी करण्यांत आलेली होती. १९५० मध्यें जगाच्या १५६ निरनिराळ्या विभागांतील सुमारें १४० कोटी लोकांची खानेसुमारी करण्यांत आली. जगाच्या लोकसंख्येपैकीं ही लोकसंख्या ५९ टक्के आहे. १९५० च्या सुमारास झालेल्या खानेसुमाऱ्यांना विशेष महत्त्व आहे; कारण त्या विशिष्ट आंतरराष्ट्रीय शिफारसीप्रमाणें करण्यांत आलेल्या आहेत. लिंगभेद, वय, लष्करी परंपरा, आर्थिक व्यवसाय, जन्मठिकाण, नागरिकत्व, शिक्षण, धर्म, शारीरिक अपंगत्व इत्यादिबाबत अनेक प्रकारचे तपशीलवार प्रश्न खानेसुमाऱ्या करतांना विचारण्यांत आले आहेत. इतके तपशीलवार प्रश्न विचारण्याचें कारण असें कीं माहिती जितकी बारकाईची त्यामानानें जगाच्या साधन–संपत्तीचा योग्य उपयोग करणें शक्य होतें. येत्या फक्त चारच पिढ्यांत खाणारीं तोंडें आजच्यापेक्षा दुप्पट होणार आहेत!

अविकसित देशांतील लोकसंख्याविषयक आंकडे बहुतेक अपुरे असतात आणि कधीं कधीं तर मुळींच नसतात. त्यामुळें अशा देशांतील खानेसुमारीचे आकडेच महत्त्वाचे ठरतात. अशा देशांतील जननक्षमता, मृत्यूचें प्रमाण आणि परदेशगमन इत्यादि संबंधींचे आकडे आर्थिक नियोजनाला फार उपयोगी पडतात. वयाच्या नोंदी केलेल्या असतील तर भावी काळांत श्रम करण्यासारखी किती माणसें असूं शकतील त्याप्रमाणें श्रमशक्तीचें नियोजन करतां येणें शक्य होतें. सामाजिक सुखसोयींच्या नियोजनासाठी कुटुंबांतील माणसांची संख्या अंदाजतां येणें महत्त्वाचें असतें. अशा प्रश्नांबाबत योग्य तो सल्लामसलत देण्यासाठीं संयुक्त–राष्ट्र–संघटनेतर्फे लोकसंख्येचा अभ्यास केलेले तज्ज्ञ मिळूं शकतात. एकाद्या देशाच्या खानेसुमारींत जमा केलेल्या आंकड्यांचें पृथःकरण करून त्यांचा त्या देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रश्नांशीं असलेला संबंध राष्ट्रसंघटनेचे विशेषज्ञ स्पष्टपणें दाखवूं शकतात. असें पृथःकरण करण्याचे उद्देश मुख्यतः दोन असतात. खानेसुमारींत आकडे कितीहि तपशिलवार जमा केले तरी लोकसंख्येची गतिमानता आणि आर्थिक व सामाजिक प्रश्न ह्यांच्यामधील कांहीं दुवे अज्ञातच राहतात. ते शोधून काढणें हा एक उद्देश; आणि एखाद्या देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाला प्रत्यक्ष व्यावहारिक वळण कसें लावतां येईल हें पाहणें हा दुसरा उद्देश. म्हणजे असें कीं ७० वर्षांनीं लोकसंख्या दुप्पट होणार आहे तेव्हां आपण अधिक उत्पादन केलें पाहिजे असें नुसतें मोघम म्हणून भागणार नाहीं. ह्या गोष्टी कोणी करावयाच्या, कोठें करावयाच्या, त्यासाठी शिक्षणाची किती आवश्यकता आहे, आणि जगाची सध्यांची आर्थिक घडी न विस्कटता हें सर्व कसें करतां येईल, ह्याहि बाबींचाहि विचार करण्यांत आला पाहिजे.

---

## बिस्किटाच्या धंद्याची कैफियत

भारतांत बिस्किटें तयार करण्याचा धंदा बराच प्रगत झालेला आहे. परंतु त्याला परदेशी बिस्किटांना तोंड देणें कठीण जात आहे. म्हणून फेडरेशन ऑफ बिस्किट मॅन्युफॅक्चरर्स ह्या मध्यवर्ती संस्थेनें बिस्किटाच्या आयातीबद्दल भारत सरकारनें आपलें धोरण बदलावें अशी मागणी केली आहे. परदेशी बिस्किटांची भारतांत आयात होत असल्यामुळें मुळांतच कमी असलेली मागणी भारतीय बिस्किटांच्या बाबतींत आणखीच घसरण्याचा संभव आहे. असें फेडरेशनचें म्हणणें आहे. फेडरेशनची तिसरी वार्षिक बैठक नुकतीच दिल्ली येथें भरली होती. त्याप्रसंगीं भाषण करतांना फेडरेशनचे अध्यक्ष श्री. ए. सी. खन्ना म्हणाले कीं, भारतांत दरवर्षीं सुमारें ३८,००० टन बिस्किटें तयार होऊं शकतील, इतकी या धंद्यांची उत्पादनक्षमता आहे. पण चालू सालीं प्रत्यक्ष उत्पादन मात्र अवघें १२,००० टनच झालें. देशांत मालाला मागणी नसल्यामुळें उत्पादनांत घट झालेली आहे, हें उघड आहे. भारतीय सरकारनें ह्या धंद्याला परकीय बाजारपेठांकडे माल निर्यात करण्यास मदत केली पाहिजे. परकीय बाजारांत भारतीय माल पाठविल्यास भारताला परदेशी हुंडणावळीचाहि लाभ होईल. सध्यां भारत सरकारकडे नोंद असलेले असे एकूण १२० बिस्किटांचे कारखाने आहेत. ह्या सर्व कारखान्यांचें मिळून उत्पादन सुमारें १२,००० टन इतकें आहे. त्याशिवाय ग्रामोद्योगाच्या स्वरूपाचे सुमारें १०० छोटे कारखाने देशांत आहेत. त्या सर्वांचें मिळून उत्पादन ३,६५० टनांच्या आसपास असावें. भारतामधील सर्वच उद्योगधंद्यांना सध्यां मंदीला तोंड द्यावें लागत आहे. बिस्किटें खाणारा ग्राहक हा मुख्यतः शहरांपुरतांच मर्यादित आहे. म्हणजे मुळांत बाजारपेठ बेताची आणि तीहि सध्यांच्या मंदीमुळें अस्थिर, अशी परिस्थिति आहे.

---

# किमान सुस्थिति व साधनसंपत्ति ह्यांची सामाजिक न्यायास आवश्यकता

## बेळगांव बँक लि. च्या वार्षिक साधारण सभेंत श्री. सराफ ह्यांचा आढावा

दि बेळगांव बँक लि. ची वार्षिक साधारण सभा ता. २४ मार्च रोजीं दुपारीं १ वाजतां बँकेच्या स्वतःच्या नवीन इमारतींत चेअरमन, श्री. एम. जी. हेरेकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाली. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या रिपोर्टास व ताळेबंदास मान्यता मिळून भागीदारांना सव्वासहा टक्के करमाफ दरानें डिव्हिडंड मंजूर करण्यांत आलें. निवृत्त होणारे तिघेहि डायरेक्टर्स, श्री. जी. एल. गजेंद्रगडकर, श्री. बी. बी. पोतदार व श्री. एम. जी. हेरेकर हे पुन्हा निवडून आल्याचें जाहीर करण्यांत आलें.

सभेपुढें रिपोर्ट व ३१-१२-१९५२ अखेरचा ताळेबंद मंजुरीकरितां मांडतांना बोर्डातर्फे श्री. गो. वि. सराफ ह्यांनीं आपल्या भाषणांत हिंदी आर्थिक परिस्थितीचा व विशेषतः कर्नाटक-महाराष्ट्रांतील व्यापारी परिस्थितीचा उत्कृष्ट आढावा घेतला. त्याचप्रमाणें समाजवादी स्वरूपाच्या नव्या नव्या योजनांच्या परिणामांकडे मार्मिकपणें लक्ष वेधलें. बँकर्सना आर्थिक परिस्थितीची जेवढी नाडी माहीत असते तेवढी इतरांना असूं शकत नाहीं आणि म्हणून बँकर्सच्या सूचनांकडे व इशाऱ्यांकडे राज्यकर्त्यांनीं जबाबदारीच्या भावनेनें लक्ष देणें इष्ट असतें. श्री. सराफ ह्यांच्या भाषणांतील मार्गदर्शनाचें अनुकरण आपल्या इतर बँकांतून होणें अगत्याचें आहे.

### श्री. सराफ ह्यांचें भाषण

"बँकेच्या या प्रशस्त नव्या स्वगृहांत आपलें स्वागत करण्यास आम्हांस फार आनंद वाटत आहे. गेल्या वार्षिक सभेच्या अध्यक्षीय भाषणांत सांगितल्याप्रमाणेंच ही सभा येथें भरत आहे, याचा आपल्या सर्वांस अभिमान वाटणें साहजिक आहे. ही इमारत तीन मजली असून शिवाय तळघरांत आधुनिक पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हाल्ट बांधविण्यांत आला आहे. यामुळें नागरिकांना एक आवश्यक अशी नवीन सोय उपलब्ध होत आहे. या इमारतीचा उद्‌घाटनसमारंभ मे महिन्यांत होईल, अशी अपेक्षा आहे. अहवालाचें वर्ष हें उद्योगधंद्यास व त्याचप्रमाणें बँकिंगच्या बाबतही फायद्याचे प्रमाणांत घट घडवून आणणारें युद्धोत्तर कालांतील पहिलें मंदीचें वर्ष, असें स्थूलमानानें म्हणतां येईल. सन १९५१ चे अखेरीस सरकारनें बँक रेट वाढवून चलनसंकोचाचें धोरण स्वीकारलें, त्याचे इष्ट व अनिष्ट परिणाम गेल्या बारा महिन्यांत स्पष्टपणें दिसून आले. सट्टेबाजीस व सांठेबाजीस आळा बसून आवश्यक वस्तूंच्या किंमती उतरल्या व उत्पादनांत वाढ झाली तरी जनतेकडे पैसा घटूं लागल्यानें तिची क्रयशक्ति कमी झाली. पगारश्रेणी व करांचें व इतर खर्चांचें प्रमाण वाढतें राहिल्यामुळें या बदलत्या आर्थिक परिस्थितींत उद्योगधंद्यांना व व्यापाऱ्यांना बरीच नुकसान सोसावी लागली. वाढती बेकारी, त्यांतच कांहीं भागांत दुष्काळाची आपत्ति व सरकारचें जमीन-विषयक समाजवादी धोरण, यामुळें मध्यम व खालच्या वर्गाला प्रतिकूल परिस्थितीशीं झगडत राहण्याची पाळी आली. गेल्या बारा महिन्यांत चलनसंकोच १२८१·४४ कोटी रु. वरून १२२३·२० कोटी रु. पर्यंत, म्हणजे ५८·२४ कोटी रुपये झाला.

"सन १९५१ सालांत व पुढें अहवालाचे सालीं पहिल्या सहामाहींत बँकांनीं दिलेलीं पतीवरील कर्जे व हुंड्या तसेंच माल-तारणावरील कर्जे यांत कमालीची वाढ दिसून आली व फायद्याचें पहिल्या सहामाहीपर्यंत प्रमाण वाढतेंच राहिलें व वर्षअखेर फायद्याचा नवीन उच्चांक गांठतां येईल अशी साधार अपेक्षा वाटूं लागली, परंतु दुसऱ्या सहामाहींत कर्जाची मागणी दरसालप्रमाणें मुळींच न आल्यानें व्याजाचा बोजा वाढला. यंदा आपल्या भागांत मुख्यतः शेंगाचें पहिलें पीक बुडाल्यामुळें व गुळाचा बाजारहि फार नुकसानीचा झाल्यामुळें व्यापाऱ्यांनीं शक्य तों कर्जाशिवाय मर्यादित उलाढाल करण्याचें सावधगिरीचें धोरण स्वीकारल्याचें दिसून आलें. यामुळें मालतारणावरच्या कर्जांत मोठ्या प्रमाणांत घट होऊन हुंड्यांचे चलनावरहि त्याचा परिणाम दिसून आला. या सर्वांचा परिणाम फायद्यांत बरीच घट होण्यांत झाला. १९५१ चे मानानें या सालीं सर्व हिंदी शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांत एकूण ८७·१७ कोटींची घट झाल्याचें दिसून येतें. समाधानाची गोष्ट एवढीच कीं फायदा कमी दिसला तरी ठेवीदारांची सर्व रकम सुरक्षित व तरती राहिली. केवळ फायदा मिळविण्यासाठी रकमा कोठेंहि गुंतविणें बोर्डास इष्ट वाटलें नाहीं. या सावधगिरीच्या धोरणावरील विश्वास नागरिकांनीं ठेवींमध्यें चांगलीच भर घालून व्यक्त केला आहे. अहवालाचे सालीं आपल्या बँकेकडील ठेवींचा आंकडा बारा लाखांनीं वाढला आहे, हें नमूद करण्यास आम्हांस अभिमान वाटतो. शेड्यूल्ड बँकांकडील एकूण ठेवी २१ कोटींनीं या अवधींत घटल्याचें दिसून आलें, तरी व्यक्तिशः आपल्याकडील ठेवींत झपाट्यानें वाढ होत आहे, हें स्पृहणीयच होय. या वाढत्या विश्वासाची फेड बोर्डाकडून ठेवीदारांचें व भागीदारांचें हितसंवर्धन जास्त दक्षतेनें करण्यांत होईल असें मी खात्रीनें सांगूं शकतों.

"या प्रसंगीं, मध्यवर्ती व राज्य सरकारांकडून समाजवादी स्वरूपाची नवी रचना करण्याचे हेतूनें नवीन नवीन घोषणा व अपुऱ्या योजना करण्यांत येत आहेत, त्याकडे आपलें लक्ष वेधूं इच्छितो. सामाजिक न्याय मिळूं नये असें कोणीही म्हणत नाहीं; म्हणणार नाहीं. परंतु हें न्यायदान अंमलांत आणण्यास आवश्यक असणारी किमान सुस्थिति व साधनसंपत्ति पुरेशा प्रमाणांत उपलब्ध असल्याची चौकशी होणें जरूर आहे. पुढारलेल्या देशांत याबाबत काय अनुभव आले याचाहि विचार होणें अगत्याचें आहे. आमचें राष्ट्र अद्याप औद्योगिक दृष्ट्या पुढारलेलें व कार्यक्षम आहे असें म्हणणें धाष्ट्यांचें होईल. सामाजिक न्याय हा केव्हांहि साधनसंपत्तीच्या प्रमाणांत मर्यादित ठेविल्यास सर्वांचें सुख संपादितां येणें शक्य होतें, न पेक्षां दुःस्थितीचीच वांटणी होत असल्याचें दिसून येणार आहे. तरी आपले पुढारी व प्रतिनिधी कोणताहि निर्णय सावधगिरीनेंच घेतील अशी आशा करणें निरर्थक होणार नाहीं. शेवटीं, आपणां सर्वांचे, तसेंच बँकेच्या सर्व अधिकारी व नोकर वर्गांनीं उत्तम सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानून आपली रजा घेतों."

### नवे चेअरमन व व्हाइस चेअरमन

यानंतर बोर्डाची सभा होऊन, पुढील सालाकरिता चेअरमन व व्हाइस चेअरमन जागीं, बँकेचे संस्थापक व वयोवृद्ध डायरेक्टर्स श्री. जी. एल. गजेंद्रगडकर, रि. डि. डि. सी. व श्री. लिंगो विरुपाक्ष देशपांडे, जनरल मर्चंट, यांची निवड करण्यांत आली.

# दुष्काळ व पाणीपुरवठा योजना

( वा. कृ. कोगेकर, एल्. एजी. )

दुष्काळ पडण्याची मुख्य कारणें म्हणजे अतिवृष्टि किंवा अनावृष्टि हीं होत. या दोन नैसर्गिक आपत्तीमुळें शेतींतील पिकें दगावतात व अन्नाची टंचाई होऊन दुष्काळ उद्भवतो. पाऊस-पाण्याच्या आपत्तीशिवाय, पिकावर किडी व रोग पडणें, टोळधाड येणें, वगैरे अन्य कारणेंहि केव्हां केव्हां दुष्काळास कारणीभूत होतात. याशिवाय धान्याच्या विषम वांटणीमुळेंहि कधीं कधीं दुष्काळी परिस्थिति निर्माण होते. परंतु सध्यासारख्या सुलभ व द्रुतगतीच्या दळणवळणाच्या सोईमुळें ही दुष्काळी परिस्थिति आटोक्यांत आणतां येते.

## महाराष्ट्र व दुष्काळ

महाराष्ट्रासंबंधानें पाहूं जातां या प्रदेशांमध्यें दुष्काळ पडण्याचें मुख्य कारण संपूर्ण अनावृष्टि नसली तरी पावसाची अनिश्चितता, तो वेळेवर न पडणें, व कित्येक वेळेस एकदम मोठ्या प्रमाणावर पडून पुढें दीर्घकाळपर्यंत उघडीप होणें हें होय. परंतु वरीलसारख्या पावसाच्या लहरी परिस्थितींतूनहि पिकें वाचवितां येणें हें अशक्य नाहीं, असें अनुभवानें समजून आलें आहे. मात्र या बाबतींत योग्य वेळीं उपाययोजना झाल्या पाहिजेत. या उपाययोजना मुख्यतः दोन प्रकारच्या आहेतः–( १ ) पडणाऱ्या पावसाचें पाणी जमिनींत मुरूं देण्याकरितां शास्त्रीय पद्धतीनें जमिनीची बांद-बदिस्ती करणें; ( २ ) पावसानें नदीनाल्यास येणारें पुराचें पाणी वाहून जाऊं न देतां मोठमोठ्या जलाशयाच्या योजना प्रत्यक्षांत आणणें, व नंतर यांतील पाण्याचा पिकांस योग्य वेळीं उपयोग करून तीं पूर्णत्वास आणणें. वरील दोन्हीहि उपाय सर्वत्र महत्त्वाचे असून त्यांपैकी पहिल्यासंबंधीं म्हणजे जमिनीची बांदबदिस्ती करणें वगैरेचे प्रयत्न चालू आहेत, परंतु दुसऱ्या उपायासंबंधीचीं कामें फारच महत्त्वाचीं असून त्याकडे जास्त लक्ष वेधणें जरूरीचें आहे.

## चालू दुष्काळी परिस्थितींतील कांहीं दृश्यें

सध्यांच्या दुष्काळी परिस्थितीचें निरीक्षण केलें असतां कनाल भागांतील शेतीपेक्षा कोरडवाहू भागांतील शेतीची व शेतकऱ्यांची स्थिति फार चिंताजनक झालेली आढळून येते. पुण्याहून दौंडला रेल्वेनें प्रवास केला असतां रेल्वेच्या दोन्ही बाजूंचा भूभाग वैराण व ओसाड असा दिसून येतो. परंतु मध्येंच जेथें विहीर आहे, तेथें एखाद्या टिंबाप्रमाणें थोडी हिरवळ दिसते. हें हिरवें टिंब म्हणजे विहिरीवरील बागायत होय. या ठिकाणीं थोडा शाळू, थोडा गहूं अगर सपला व जनावरांकरितां थोडें कडवळ अगर मका किंवा लुसर्न वगैरे पिकें केलेलीं दिसून येतात. हें केवळ पाण्यामुळेंच शक्य झालें. वरीलपेक्षा वेगळी परिस्थिति पुण्याहून खडक-वासल्याकडे सकाळच्या वेळीं जाऊं लागलें असतां दिसून येते. या रस्त्यानें मजुरी करणारे स्त्री-पुरुष लहान लहान टोळक्यांनीं, प्रत्येकाबरोबर एक शेळी किंवा शेरडी ( दुधाकरितां ठेविलेली ) घेऊन मुठा कनालवरील बागायत शेतीमध्यें काम करण्याकरितां चाललेले दिसून येतात. हे सर्व लोक पंढरपूर किंवा सातारा भागांतून आलेले व शेती मुळींच नसणारे किंवा थोडी शेती असणारे असे पुण्यास मजुरीकरितां येऊन स्थाईक राहिलेले होत. यांचा चरितार्थ केवळ मुठा कनालवरील बागायत शेतीवर मजुरी करूनच चालतो. संध्याकाळीं दिवस मावळल्यानंतर हे लोक व कांहीं बाया खुरपलेल्या हिरव्या चाऱ्याचें एकएक गांठोडें डोक्यावर घेऊन येतांना दिसतात. या लोकांस नेहमीं येथें काम मिळून एका शेरडीचें पोषण व बाया माणसांस हिरव्या चाऱ्यापासून मिळणारी थोडी कमाई, हें सर्व केवळ खडकवासल्याच्या तलावापासून निघणाऱ्या कनालच्या पाण्यावरील बागायत शेतीमध्यें काम मिळाल्यामुळेंच शक्य झालें. हा खडकवासल्याचा तलाव वाढविण्याचें बरेच दिवसापासून घाटत असल्याचें ऐकण्यांत आहे. या तलावाची वाढ झाल्यास पुण्याच्या पूर्वेस दौंड पर्यंतच्या प्रदेशास पाणी-पुरवठ्याची सोय होऊन वारंवार पडणाऱ्या दुष्काळाची तीव्रताहि पुष्कळच कमी होईल.

## इतर देशांतील पाऊसमानाची स्थिति

शेती फलदाई होण्याकरितां लागणाऱ्या अवश्य घटकांपैकीं पाणी हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक होय. जपान देशामध्यें तेथील शेतकरी वर्षांत लागोपाठ तीन पिकें काढतात, असें ऐकण्यांत येतें. त्यामुळें अगदीं लहानशा जमिनीच्या तुकड्यावर तेथील शेतकरी आपल्या कुटुंबाचें पोषण करूं शकतो. यास दुसरीं अनेक कारणें असलीं, तरी तेथें सबंध वर्ष-भर, बाराहि महिने, थोडा थोडा पाऊस पडतो. शिवाय, पाटाच्या पाण्याचीहि सोय असल्यानें पिकांस जरूर तेव्हां पाणी मिळूं शकतें, ही महत्त्वाची बाब दृष्टीआड करतां कामा नये. तेथें पाण्याचा प्रश्न व्यवस्थितपणें सुटल्यानें शेतीच्या इतर बाबींमध्यें शेतकरी तनमनधन घालून काम करूं शकतो. परंतु आपल्याकडील पाऊसमानाची परिस्थिति अत्यंत अनिश्चित असल्यामुळें शेत-कऱ्यास पिकाबद्दलची निश्चिति कधींच वाटत नाहीं व त्यास नेहमीं आकाशाकडे डोळे लावून बसावें लागतें.

आस्ट्रेलिया* हाहि आपल्या हिंदुस्थान देशाप्रमाणें उष्ण कटि-बंधांतीलच एक देश आहे. येथील पावसाचें वार्षिक प्रमाण महाराष्ट्रां-तील दुष्काळी भागांत पडणाऱ्या पावसाइतकेंच असतें. परंतु या प्रदेशांत पाऊस प्रत्येक महिन्यांत थोडा थोडा असा सबंध वर्षभर पडतो. त्यामुळें पिकांची योग्य जोपासना होऊन तीं उत्पन्न देऊं शकतात. परंतु आपल्याकडील पाऊसमानाची स्थिति कशी आहे पहा. पावसाच्या दोन्हीहि हंगामांत पडणारा पाऊस सुमारें ३० ते ४० दिवसांच्या अवधींत सर्व पडून जातो. त्यामुळें पिकांच्या सबंध आयुष्यांत त्यांस पाहिजे तसें पाणी मिळत नाहीं. यामुळें तीं करपून मरून जातात. यास उपाय म्हणजे वेळेवार पाणी मिळण्याकरितां मोठें जलाशय व पाटबंधारे हाच केवळ होय.

## जलसंचयांचें महत्त्व

वर निदर्शित केलेल्या परिस्थितिवरून पाणीपुरवठ्याच्या योजना अस्तित्वांत आणण्यानेंच पिकांच्या निश्चिततेचा नेहमीं भेडसावणारा प्रश्न सुटणें शक्य आहे हें दिसून येईल.

पाणीपुरवठ्याच्या साठ्यांचें महत्त्व केवळ दुष्काळी वर्षांपुरतेंच असतें असें नसून अशा साठ्यामुळें सर्व प्रकारचीं कमीअधिक मुदतीचीं पिकें करतां येतात. सर्व प्रकारचीं धान्यपिकें व त्याचप्रमाणें व्यापारी अगर पैसा देणारीं पिकें म्हणजे, कापूस, ऊंस, फळझाडें, वगैरेंहि करतां येतात. पावसाच्या अभावीं वेळच्या वेळीं पिकांस पाणी मिळण्याची सोय झाल्यामुळें तीं दगावण्याची वास्ती कमी होते. शेतकऱ्यामध्यें शेती करण्याच्या कामीं एक प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न होतो. निरनिराळीं पिकें होऊं लागल्यामुळें देशामध्यें लहानमोठे उद्योगधंदे सुरू होऊन आस-

* "आस्ट्रेलियांतील दुर्जल शेती", शेतकी आणि शेतकरी मासिक, नोव्हेंबर १९५२.

खासच्या खेड्यांतील लोकांना आपल्या भागांतच काम मिळून उपासमारी टळते.

महाराष्ट्राच्या कांहीं थोड्या भागामध्यें कनालचें पाणी मिळतें त्या प्रदेशांतील एकंदर परिस्थितीचें अवलोकन केलें असतां वारंवार पडणाऱ्या दुष्काळाच्या आपत्तीपासून तो पुष्कळच निर्धास्त झालेला दिसून येतो, व यामुळें औद्योगिक व इतर प्रगतीसाहि बरीच मदत झालेली आढळून येते. पुणें जिल्ह्यांतील नीरा कनालवरील "वालचंदनगर"* या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या साखरकारखान्याचें उदाहरण पहा. हा मूळचा साखर तयार करण्याकरितां निघालेला कारखाना. येथें उसाची लागवड मोठ्या प्रमाणावर आहे परंतु साखरेच्या कारखान्याच्या अनुषंगानें येथें अनेक लहानमोठे धंदे निघालेले आहेत. उ. तेलाचा कारखाना, कनफेक्शनरी म्हणजे मिठाईचे पदार्थ करणें, कामटी पुठे करणें, प्लॅस्टिकचा कारखाना, डेरी किंवा दुधाचा धंदा याप्रमाणें औद्योगिक कारखाने व शेतीशीं संलग्न असा दूधदुभत्याचा धंदा वगैरे येथें सुरू करतां आले आहेत. हे सर्व धंदे चालविण्याकरितां आजूबाजूच्या बिन-कनाल भागांतील हजारों लोकांस येथें उद्योगधंदा मिळून त्यांची बेकारी नाहींशी होऊन येथें निर्वाहाच्या साधनाची सोय झालेली आहे.

डेरीचा धंदा सुरू झाल्यानें दुधाचें उत्पादनहि मोठ्या प्रमाणावर होऊं लागलें आहे. पुण्यासारख्या मोठ्या शहरास येथून दुधाचा पुरवठा होऊं लागला आहे. या कारखान्याच्या एकंदर लागवडीखालील क्षेत्राचा ½ हिस्सा जमिनीवर धान्याचीं पिकें केलीं जातात. कारखान्यामध्यें सुमारें पंधरा हजार लोकांना काम मिळूं शकतें. यावरून कनालमुळें खेड्यांतील व शहरांतील लोकांसाहि कसा फायदा होतो हें दिसून येईल. महाराष्ट्राच्या सर्व दुष्काळी भागांत याप्रमाणें पाणीपुरवठ्याची व्यवस्था झाल्यानें हा सर्व प्रदेश संपन्न व सुखी होऊं शकेल यांत संशय नाहीं.

### पाटबंधाऱ्याबाबत कांहीं आक्षेप

पाटबंधाऱ्यानिमित्त आमजनतेचा पैसा खर्च होऊन, कनालपासून फायदे फक्त कांहीं थोड्या मोठ्या शेतकऱ्यांस व व्यापारी लोकांस होतात, अशा प्रकारचे आक्षेप घेतलेले क्वचित ऐकूं येतात. या बाबतींत हें लक्षांत बाळगिलें पाहिजे कीं, कनालवर मोठ्या प्रमाणांत शेती किंवा धंदे सुरू झाले असतां हे धंदे चालविण्याकरितां किती तरी लोकांची जरूरी असते. उलटपक्षीं, दुष्काळी भागांतील लोकांस कामाविना बरेच दिवस अर्धपोटी काढावें लागतात. अशा सर्व लोकांना घरच्या घरीं काम मिळण्याचें हें एक मोठें साधन होतें व हा प्रश्न पाण्याची सोय झाल्यानेंच सुटणें शक्य होतें. तेव्हां कांहीं मोठ्या शेतकऱ्यांसच केवळ फायदा होतो हें म्हणणें सर्वांना सम्मत होण्यासारखें नाहीं. मोठे शेतकरी फायदा घेतात म्हणून कनाल काढूंच नयेत हें तत्त्व पत्करल्यास मोठाच अनवस्था प्रसंग निर्माण होईल. याचा अर्थ असा कीं, या प्रदेशांतील लोकांनीं सदोदित उपासमार काढावी असें म्हणण्यासारखें होईल.

कनालवर केवळ मोठ्या शेतकऱ्यास किंवा भांडवलवाल्यासच धंदे सुरू करतां येतात असें म्हणतां येणार नाहीं. कनालवर शेती असणाऱ्या सर्व लहानमोठ्या बागायतदारांस सहकारी रीतीनें धंदे काढतां येतात व या दृष्टीनें कार्य सुरूहि झालेलें आहे. अहमदनगर जिल्ह्यांतील एका कनालवर एक साखरेचा कारखाना सहकारी तत्त्वावर सुरू झालेला आहे. 'योजकः तत्र दुर्लभः' या न्यायानें रचनात्मक कार्यकर्त्यांची जरूरी आहे हेंच मुख्य होय. यावरून कनालवरील मोठे धंदे केवळ भांडवलवाल्यांची मिरास होय असें म्हणतां येणार नाहीं.

धी फॅमिन इन्कायरी कमिशन फायनल रिपोर्ट १९४५* यामध्यें पाणीपुरवठा योजना बाबतींत केलेले उल्लेख अत्यंत विचार करण्यासारखे आहेत. कमिशनचें म्हणणें असें कीं वाढत्या लोकसंख्येशीं शेतींतील उत्पन्नाचें प्रमाण समपातळीवर वाढण्याकरितां पिकांस पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व प्रकारच्या योजनांचा पूर्ण विकास होणें अत्यंत जरूरीचें आहे. पाणीपुरवठ्याच्या योजनांवर होणाऱ्या खर्चासंबंधीं सदर रिपोर्टामधील शिफारस खालीं इंग्रजींत जशीच्या तशी दिली आहे.

(iii). In estimating the financial soundness of an irrigation scheme account should be taken not only of the revenue directly attributable to the work in question, but also of the additional revenue indirectly accruing to Government as a result of the increase in the wealth of the population. An irrigation scheme promotes the well-being and the standard of living of the people and there is, therefore, nothing intrinsically unsound in general revenues contributing to the loan charges of well considered schemes.

वरील इंग्लिश अवतारणावरून, स्पष्ट होईल कीं पाण्याच्या योजनावर होणारा खर्च मुळींच अस्थानी नसून त्यामुळें देशांतील लोकांच्या रहाणीचें मान वाढून देशाच्या संपत्तींतहि भर पडते. हे विचार देशाच्या दृष्टीनें किती महत्त्वाचे आहेत हें सहज लक्षांत येईल.

### शेतकऱ्याकरितां दुय्यम धंदे व पाणीपुरवठा.

शेतकऱ्यास शेतीचीं कामें सबंध वर्षभर नसतात. त्यामुळें त्याचे वर्षांतील बरेच दिवस विनाकारण फुकट विनाप्राप्ति जातात. करितां शेतीचें काम नसल्यावेळीं त्यांस त्याच्या गांवींच घरगुती दुय्यम धंदे मिळावे व त्यापासून त्याच्या चरितार्थासहि थोडी मदत व्हावी या हेतूनें धंद्याची जरूरी असते. असे धंदे खेडेगांवीं काढण्याचे प्रयत्न सरकारांतून चालूं आहेत. परंतु अशा लहान धंद्यापासून निर्माण झालेल्या वस्तू बाजारांतील स्पर्धेत किंमतीच्या बाबतींत टिकाव धरून खपणें मुष्कीलीचें होतें. या संबंधांत "टाइम्स ऑफ इंडिया" या दैनिक इंग्रजी पत्राच्या ५ फेब्रुवारी १९५२ च्या अंकांत "दुरसटलेली विचारसरणी" या मथळ्याखालीं एक संपादकीय लेख आलेला आहे. त्यांतील मजकूर बराच मननीय आहे. या लेखांतील आशय असा कीं खेडेगांवच्या परिस्थितींत शेतकऱ्यास नेहमीं उद्योग मिळण्याकरितां पिकास पाणी मिळण्याची व्यवस्था झाल्यास, शेतकऱ्यास नेहमीं शेतींत काम मिळून दुय्यम घरगुती धंद्याच्या बाबतींतील प्रश्न सुटूं शकेल. शेतीस पाण्याची सोय झाल्यानें, शेतीशीं संलग्न असा दुधाचा धंदा ( डेरी ) व कोंबड्या पाळणें वगैरे धंदे शेतकऱ्यांस चालू करतां येऊन दुय्यम धंद्याचा प्रश्न सुटेल.

वरील वरून शेतीस पाणीपुरवठ्याचा प्रश्न हा शेतीच्या बाबतींत किती मूलग्राही आहे हें दिसून येईल.

### भाटघरचा तलाव व चंद्रभागेचा प्रवाह

नुकतेंच वाचण्यांत आलें आहे कीं पंढरपुरांतील चंद्रभागेचें पाणी कमी होत असून नदीस सांडवे पडूं लागले आहेत. त्यामुळें

* 'वालचंदनगर', पुणें म्युनिसिपल गॅझेट, दि. १५ नोव्हेंबर १९५२.

* The Famine Enquiry Commission Final Report 1945 p. 142.

पंढरपुरास व यात्रेकरूंस पाण्याची टंचाई भासूं लागेल तेव्हां पाणीपुरवठ्याकरितां भाटघर तलावांतून पाणी नदीस सोडावें लागेल. यावरून भाटघर तलाव हा दुष्काळी प्रदेशास शेतीकरितां किंवा पिण्याच्या पाण्याच्या बाबतींत केवढा आधार झालेला आहे हें दिसून येतें. भाटघर तलाव अस्तित्वांत आल्यानें या दुष्काळी भागाचा केवढा तरी कायापालट झालेला आहे हें सहज लक्षांत येईल. सारांश, दुष्काळी प्रदेशाकरितां मोठे जलसंचय व पाटबंधारे हा एक मोठा तारक उपाय होय; या बाबतींत दुमत होण्याचें कारणच नाहीं.

### "किर्लोस्कर न्यूज"

किर्लोस्कर संघटनेच्या विविध संस्थांतील वृत्त देणाऱ्या "किर्लोस्कर न्यूज" ह्या इंग्रजी पत्रिकेचा दुसरा अंक प्रसिद्ध झाला आहे. मुखपृष्ठावर श्री. शंकरराव किर्लोस्कर ह्यांच्या, डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या वार्षिक सभेंतील अध्यक्षीय भाषणांतील महत्त्वाचा भाग देण्यांत आला आहे. नंतर, किर्लोस्करवाडी, हरिहर, पुणें आणि बंगलोर येथील किर्लोस्कर कारखान्यांचें वृत्त दिलेलें आहे. कागद, छपाई, चित्रें, मांडणी, उठाव, ह्या सर्वच दृष्टीनें "किर्लोस्कर न्यूज"चा हा अंक आकर्षक झाला आहे.

### "यात्रा-मार्गदर्शिका"

स्वतंत्र भारतांतील पुण्यक्षेत्रांच्या यात्रा; काश्मिर, म्हैसूर, सिलोन, इत्यादि ठिकाणच्या सहली योजून महाराष्ट्रीय जनतेला यात्रा व प्रेक्षणीय स्थळांचें दर्शन घडविणारी श्री दत्तदिगंबर यात्रा कंपनी मधून मधून यात्रा-माहिती-पत्रिका काढीत असे, तिचें आतां वरील द्वैमासिकांत रूपांतर करण्यांत आलें आहे. नियोजित सहल प्रवासेच्छुकांना मार्गदर्शक माहिती त्यांत देण्यांत येते. चैत्र-वैशाखाच्या प्रस्तुत पहिल्या अंकांत श्री बद्रीकेदार-बद्रीनारायण यात्रेची तपशीलवार माहिती दिलेली आहे. ती सामान्य वाचकांनाहि मनोरंजक व उद्बोधक वाटेल. (संपादक: दत्तात्रय दिगंबर कुलकर्णी. वा. व १॥ रु. किरकोळ अंक ४ आ. १८१ शनवार, पुणें २.)

### दि सातारा स्वदेशी कमर्शिअल बँक लि., सातारा

१९५२ सालीं वरील बँकेस ३३,०२९ रु. नफा झाला. १०,००० रु. रिझर्व्ह फंड, ५,००० रु. इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह फंड, १४,५०० रु. डिव्हिडंड (ऑर्डिनरी भागांवर ६% करमाफ), २,५०० रु. नोकरवर्गाकरितां बोनस, अशी नफ्याची वाटणी करण्यांत आली. बँकेचे डायरेक्टर किंवा अधिकारी ह्यांना किंवा त्यांचा हितसंबंध असलेल्या कंपन्या अथवा फर्म्स ह्यांना बँकेनें अहवालाचे वर्षांत केव्हांहि, एक पैसुद्धां, कर्ज दिलेलें नाहीं, ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे. पळवाटा काढून बँकांचे संचालक दडपणानें अधिकाराचा दुरुपयोग करतात त्यावर जालीम उपाययोजना "हत-बला"नें "अर्था"च्या दिवाळी अंकांत सुचविली होती. सातारा स्वदेशी कमर्शिअल बँकेनें ह्याबाबत दाखविलेला आदर्श आम्हीं मुद्दाम वाचकांच्या नजरेस आणतों. इतर कोठल्याहि बँकेच्या ताळेबंदांत हें सदर कोरें आढळलेलें नाहीं. (चेअरमन: शि. दा. लिमये. मॅनेजर: व. य. कुलकर्णी.)

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | २,४०,८८० | कॅश, बँकांत | ४,२३,५९० |
| रिझर्व्ह, इतर फंड | १,५८,००० | इन्व्हेस्टमेंट | १९,०९,८१० |
| ठेवी | ४०,१४,९४५ | कर्जें | २१,९६,५७२ |


## संसाराचा गाडा सुस्थित चालवायला सतत बचतीचें वंगण हवें

संसारी जीवनास सुरुवात झाली कीं, खर्चाचा व्याप सतत वाढता असतो. मिळवणाराची मिळकत बहुधा ठराविक, पण खर्चाला वाटा मात्र अनेक. मिळवलेली सर्व कमाई रोजच्या खर्चासाठीं संपली, तर सण-समारंभ, अहेर-देणग्या, आजार-प्रवास यांसारख्या प्रासंगिक आणि आकस्मिक प्रसंगीं दीनवाणें व्हावें लागतें. म्हणून प्रत्येक संसारी व्यक्तीनें थोडथोडी शिल्लक ही टाकलीच पाहिजे.

### न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

या शेड्यूल्ड बँकेंत तुमचें सेव्हिंग खातें सुरू करण्यानें हरघडीं येणाऱ्या प्रासंगिक व आकस्मिक खर्चांची तरतूद करतां येते. मुंबई व उपनगर यांतून या बँकेच्या सध्यां सात शाखा असून महाराष्ट्राचे इतर भाग, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, दिल्ली व पूर्वपंजाब मिळून एकंदर अठ्ठेचाळीस शाखा आहेत. तुम्हांला बँकेंत खातें उघडावयाचें असेल, तर आपल्या नजीकच्या न्यू सिटिझन बँकेच्या शाखा-व्यवस्थापकांना भेटा. तुम्हांला योग्य तो सल्ला व जरूर ती सर्व माहिती आनंदानें दिली जाईल.

### न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

विठ्ठलदास चेंबर्स, अॅपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १

शाखा : मुंबई व उपनगरें—गिरगांव, क्वीन्स रोड, झवेरी बझार, दादर, माटुंगा, शीव व विलेंपारलें.
शिवाय महाराष्ट्राचे इतर भाग, मध्यप्रदेश, गुजरात, उत्तरप्रदेश, दिल्ली व पूर्वपंजाब यांतून एकेचाळीस शाखा आहेत.

## ज्ञानप्रसारावर कर ?

### पोस्टानें पुस्तकें मागविणारांवर भूर्दंड

बुकपोस्ट, व्ही. पी., पोस्ट पार्सल, इत्यादींचे दर आतां वाढविण्यांत आले आहेत त्यामुळें पुस्तकें मागविणारांवरील खर्चाचा बोजा तीव्रतर झाला आहे, अशी तक्रार बाँबे बुकसेलर्स असोसिएशननें केली आहे. व्ही. पी. च्या दरांत रुपयांत चार आणे वाढ झाली आहे. एखाद्या विद्यार्थ्यांनें व्ही. पी. नें पुस्तक मागविलें, तर त्याचा खर्च खालीलप्रमाणें येतो. ( पुस्तकाची किंमत १ रु. व त्याचें वजन २० तोळे. )

| पूर्वीच्या दरानें हिशेब | रु. | आ. | पै. | नव्या दरानें हिशेब | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| किंमत | १ | ० | ० | किंमत | १ | ० | ० |
| पोस्टेज | ० | २ | ३ | पोस्टेज | ० | ४ | ० |
| व्ही. पी. चार्ज. | ० | २ | ० | व्ही. पी. चार्ज | ० | २ | ० |
| रजिस्ट्रेशन | ० | ४ | ६ | रजिस्ट्रेशन | ० | ६ | ० |
| व्ही पी. सरचार्ज | ० | १ | ० | व्ही. पी. सरचार्ज | ० | १ | ० |
| | १ | ९ | ९ | | १ | १३ | ० |
| मागणीसाठी पोस्टकार्ड | ० | ० | ९ | मागणीसाठी पोस्टकार्ड | ० | ० | ९ |
| इन्व्हॉइससाठी पोस्टेज | ० | ० | ९ | इन्व्हॉससाठी पोस्टेज | ० | ० | ९ |
| पॅकिंग खर्च | ० | ० | ६ | पॅकिंग खर्च | ० | ० | ६ |
| | ० | २ | ३ | | ० | २ | ३ |
| | १ | ११ | ९ | | १ | १५ | ३ |

व्ही. पी. पी. नें पुस्तक मागविणाऱ्या विद्यार्थीस किती खर्च येतो व त्यांपैकीं किती मोठा भाग पोस्टखात्याकडे जातो, हें वरील तुलनात्मक तक्त्यावरून लक्षांत येईल. पुस्तकाची किंमत वाढत जाईल, त्या मानानें कराचें प्रमाण उतरत जातें; म्हणजे कमी प्राप्तीच्या लोकांकडून मुख्यतः करवसुली होईल हें उघड आहे. शहरांतील लोकांना जें पुस्तक १ रुपयास मिळेल त्यासाठी अंतर्गत ठिकाणच्या लोकांना सुमारें २ रु. द्यावे लागतील. शहरी जनतेचा हा मोठाच फायदा आहे. पोस्ट पार्सलांच्या बाबतींतहि लहान माणसावर अन्याय होणार आहे.

### दि यूनियन बँक ऑफ कोल्हापूर लि., कोल्हापूर.

१९५२ मध्यें वरील बँकेस २७,३०९ रु. नफा झाला. ६,००० रु. रिझर्व्ह फंड, १,००० रु. बॅडडेट व रिझर्व्ह फॉर कॉन्टिन्जन्सी फंड, ६,००० रु. इन्व्हेस्टमेंट फंड, ४,९९९ रु. डिव्हिडंड ( ३% करमाफ ), ९,३०० रु. इन्कमटॅक्स तरतूद अशी नफ्याची वांटणी करण्यांत आली. ( चेअरमन : शेठ चुनीलाल ऊर्फ बाबूभाई माशिंगजी परमार. मॅ. डायरेक्टर : गोपाळ गणेश श्रीखंडे. )

संक्षिप्त ताळेबंद

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | १,७१,४०० | कॅश, बँकांत | ६,२२,५०० |
| रिझर्व्ह, इतर फंड | १,०९,००० | इनव्हेस्टमेंट | ६,४४,११३ |
| ठेवी | २०,९१,८५४ | कर्जें | ८,७२,३२० |

**संततिनियमनासाठी पैसा**—अहमदाबादच्या कॉर्पोरेशननें संततिनियमन आणि कुटुंबनियोजन ह्यासंबंधीं सल्लामसलत देणारीं केंद्रें काढण्याचें ठरविलें आहे. ह्या योजनेसाठी २५,००० रुपयांची रक्कम मंजूर करण्यांत आली आहे.

### पॅरॅमाऊंट उद्योग-व्यापार वार्षिक

उद्योग-व्यापार क्षेत्राच्या विविध विभागांसंबंधीं माहितीपूर्ण पण मनोवेधक पद्धतीनें वार्षिक प्रकाशनाच्या रूपानें वाचकांना सामुग्री पुरवावी ह्या हेतूनें पॅरॅमाऊंट पब्लिसिटी सिंडिकेट लि. नें आठ महिन्यांपूर्वी ह्या प्रकाशनाचा संकल्प केला व वर्षप्रतिपदेस, १६ मार्च रोजीं, तो तडीस नेला. सौराष्ट्र-गुजरातमधील यशस्वी उद्योगपति श्री. परशुरामपंत गोडबोले ह्यांच्या हस्तें ह्या वार्षिकाचें प्रकाशन झालें. प्रस्तुत ग्रंथाचें संपादन अत्यंत आकर्षक रीतीनें झालें असल्याचें तात्काळ लक्षांत येतें. ग्रंथाची योजना केल्यानंतर ती यशस्वी करण्याचे मार्गांत अनेक अडचणी येतात त्यांचा विचार करता, संपादकांनीं ग्रंथनिर्मितींत मिळविलेल्या यशाबद्दल त्यांचें कौतुकच केलें पाहिजे. आपले व्यापारी व कारखानदार त्यांचे विचार मांडण्यास पुरेशा संख्येनें अद्याप पुढें येत नाहींत. तथापि, संपादकांनीं ती उणीव भरून काढली आहे आणि कित्येक नामवंत तज्ञांचें साहाय्य मिळवून ग्रंथ उपयुक्त व माहितीपूर्ण केला आहे. पॅरॅमाउंट उद्योग-व्यापार वार्षिकाचा हा पहिला खंड आहे, आणि त्याच्यामध्यें श्री. न. वि. गाडगीळ, श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. ग. रा. साठे, श्री. वा. काळे, श्री. चिं. वि. जोग, प्रभृति लेखकांचे विविध औद्योगिक विषयावरील सुमारें ५० माहितीपूर्ण लेख समाविष्ट केलेले आहेत. संपादक: ना. तु. ठाकूर, संचालक, पर्सनल प्रेस सर्व्हिस. पृ. सं. २६०. किं. ३ रु.

**विजेचा पुरवठा असणारीं शहरें**—भारतामध्यें ज्या गांवांची अगर शहरांची लोकसंख्या ५०,००० अगर त्याहून अधिक आहे अशा सर्वांना विजेचा पुरवठा होतो. २०,००० अगर त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या बहुतेक गांवांनाहि विजेचा पुरवठा मिळतो.

**फळें टिकविण्याचा कारखाना**—संयुक्त प्रांतांत रामगढ ह्या ठिकाणीं फळांच्या बागा पुष्कळ आहेत. फळें टिकविण्याच्या धंद्याची माहिती करून देण्यासाठीं गेल्या वर्षीं राज्य-सरकारनें तेथें शिक्षण-केंद्र काढलें होतें. आतां सहकारी तत्त्वावर चालविण्यांत येणारा फळें टिकविण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे असें समजतें.

### युरोपांतील दुष्काळनिवारणासाठीं मुंबईमध्यें एका नृत्य बैठकींत ७५ हजार रुपये

ग्रेट ब्रिटन आणि नेदरलंड्स येथील पुरामुळें नुकसान झालेल्यांच्या मदतीसाठीं गुरुवार, ता. २६ मार्च १९५३ रोजीं मिसेस होमी मोदी ह्यांनीं आपल्या घरीं एक नृत्य-समारंभ घडवून आणला. त्यास ८०० लोक उपस्थित होते. त्या समारंभाचे प्रसंगीं ७५,००० रुपये वर्गणी जमली.

### आणि महाराष्ट्रांतील दुष्काळासाठी ?

पुणें मेयॉरच्या दुष्काळनिधीची एकूण रक्कम २८ मार्च, १९५३ अखेर २७,१५३ रु. २ आणे एवढी झाली आहे.

प्रा. धनंजयराव गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखालील सर्वपक्षीय महाराष्ट्र मध्यवर्ती दुष्काळनिवारण समितीच्या निधीची रक्कम ७५,००० रु. एवढी झाली आहे. १४ डिसेंबर, १९५२ पासून आतांपर्यंत जमा झालेली ही रक्कम आहे.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.